A.Bove - 18

1

1st

Chief Postmaster General

27 JUL 2017

Received

Mumbai-400 001

# मुख्य पोस्टमास्टर, जनरल कार्यालय, महाराष्ट्र सर्कल, मुंबई-४०० ००१. यांचे वतीने

---

## • पत्रलेखन स्पर्धा : १८ वर्षावरील (खुला) गट

---

• पत्रलेखनाचा विषय : प्रिय बापू (महात्मा गांधी) आपण मला प्रेरित करता..

---

- स्पर्धकाचे नांव : गजानन बाळासो खडके (बंदी क्र.सी-४३५८)
- स्पर्धकाचे वय : ४२ वर्षे
- पत्ता : कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा ४१६ ००७. (महाराष्ट्र)
- कार्यालयाचा फोन क्रमांक फोन नं. ०२३१-२३२४२१९-३२१
- फॅक्स नं. ०२३१-२३२४२१९
- सदर स्पर्धक हा गेल्या ११ वर्षापासून कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा येथे जन्मठेपेची शिक्षा कारागृहीन नियमानुसार भोगत आहे.

---

email id : kolhapurprison@gmail.com

MO
Smita
Hemal
W
PM/Sr.deshpande



# "प्रिय बापू, (महात्मा गांधी) आपण मला प्रेरित करता..!"



परमपूज्य आदरणीय प्रिय बापूजी, मी कोल्हापूर मध्यवर्ती कारागृह, कळंबा (महाराष्ट्र) कोल्हापूर येथे गेल्या ११ वर्षांपासून जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला बंदी (कैदी) तुमचा अनुयायी गजानन बाळासो खडके यांचा शिर साष्टांग नमस्कार वि.वि.

बापू, मी पूर्वाश्रमीचा शिक्षक, परंतु मला नियतीने गुन्हेगार ठरविले. बापू आपणही तुरुंगवास भोगला. मी आपली आत्मकथा व सत्याचे प्रयोग ही पुस्तके वाचली. मी तुरुंगात येण्यापुर्वीही व तुरुंगात आल्यानंतरही मला नेहमीच आपण प्रेरित करीत आला आहात. बापू, आपणास आफ्रिकेत दोन महिन्याची शिक्षा सुनावली. तेथील तुरुंगातील मीठ नसलेले बेचव जेवण, अपुरे जेवण व सुविधा, तेथील झालेली उपासमार या सर्व घटना वाचल्यानंतर माझे मन सुन्न होते. मला या तुरुंगात या तुमच्या जीवनातील घटनाच नेहमी प्रेरित करतात. तुमची प्रतिमा डोळ्यासमोर ठेवूनच मी दिवस कंठीत आहे. तुरुंगात जिभेचे चोचले चालत नसतात, हे आपणाकडून शिकलो.

बापू, आपण शाकाहार स्वीकारलात. स्वादाचे खरे स्थान जीभ नव्हे तर, मन आहे असे सांगून शुद्ध शाकाहारी बनून जिभेचे चोचले पुरविण्याचे बंद केलात. बापू, मीही लिंगायत म्हणजे लिंग धारण करणारा असल्याने शाकाहारी आहे. त्यामुळे मला आपल्या शाकाहाराचे तत्व नेहमीच प्रेरित करीत आले आहे.

बापू, आपण म्हणाता, व्यायामाला म्हणजे शारीरिक शिक्षणाला मानसिक शिक्षणाच्या बरोबरीचे स्थान विद्यार्जनात असले पाहिजे. खरंच बापू, आज या कारागृहात शिस्तीचे धडे गिरवित असताना कळंबा कारागृह प्रशासनाने योगाचे धडेही आम्हा बंदी बांधवांना गिरविण्याचे पाऊल उचलून त्यासाठी, या योगासनाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या बंदींना तीन महिन्यापर्यंत शिक्षेत माफी देण्याची तरतूद करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे बापू या योगासनाचा सराव करीत असताना नेहमी आपणच मला प्रेरित करता.

बापू, आपण नेहमीच, सत्यमय होण्यास अहिंसा हा एक मार्ग आहे आणि अहिंसा ही नम्रतेची पराकाष्ठा आहे असे सांगत आलात. यासाठी प्रभू येशूच्या गिरीप्रवचनाची छाप आपल्यावर पडली. 'तुझा सदरा मागेल त्याला कोटही दे, तुझ्या उजव्या गालावर थप्पड मारील त्याच्यासमोर डावा गालही धर' धर्म त्यागामध्ये आहे, ही गोष्ट आपणास पटली. बापू या आपल्या अहिंसेच्या मार्गाने मी या कारागृहात ११ वर्षे भोगली, त्यामुळे आज माझ्यात 'विनम्रता' आणि 'विवेक' आत्मसात होण्याचे प्रमुख कारण आपणच आहात, यासाठी आपणच मला नेहमी प्रेरित करता.

बापू, आपण आप्त-स्वकीय, देशी-परदेशी, गोरे-काळे, हिंदू आणि मुस्लिम, ख्रिस्ती, पारशी किंवा यहुदी यांच्यामध्ये भेद करणे असतो, तो तुमच्या मनाला शिवलेला नाही. त्यामुळे बापू आपण रचलेली प्रार्थना 'ईश्वर अल्ला तेरो नाम, सबको सन्मती दे भगवान' 'रघुपती राघव राजाराम, पतीत पावन सिताराम' ह्या प्रार्थना आजही या कळंबा कारागृहात नियमितपणे स्पिकरवरुन आम्हा बंद्यांना